‘श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर’ विकास आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०२६/प्र.क्र.१८/का.१४४४-अ/ई-१६०८९७१**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १८ जून, २०२६**

वाचा : १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०४ जून, २०१५.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक १९ जुलै, २०१६.
३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस-२०१८/प्र.क्र.७५/ रस्ते-९अ, दिनांक २५ जानेवारी, २०१९
४) नियोजन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२.
५) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: तीक्षेवि-२०२३/प्र.क्र.१५/का.१४४४ - अ, दिनांक १९ जून,२०२३
६) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीडीजी-२०२४/प्र.क्र.९५/ इमारती-२, दिनांक २८ ऑगस्ट, २०२४
७) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे दिनांक १८.०३.२०२६ रोजीचे पत्र.
८) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २१.०४.२०२६ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीचे इतिवृत्त.
९) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक ०४.०५.२०२६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०४.०६.२०१५ अन्वये राज्यातील तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळ परिसर विकास आराखडा अंतिम करणे व अंमलबजावणीसाठी धोरण / मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच दिनांक १९.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये यातील काही तरतूदी/निकष याबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

०२. नियोजन विभागाच्या संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये ‘पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखडा ’ (रूपये७३८५.९५ लक्ष) किंमतीच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर आराखड्यांतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. पंढरपूर हे

महाराष्ट्रातील अत्यंत महत्वाचे धार्मिक व सांस्कृतिक तीर्थक्षेत्र आहे. दरवर्षी आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी या चार वाऱ्यांच्या काळात लाखो वारकरी पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणींच्या दर्शनासाठी येतात. भाविकांची सतत वाढणारी संख्या, मंदिर परिसरातील अरुंद मार्ग, अतिक्रमणे, वाहतूक कोंडी, अपूऱ्या सुविधा आणि संभाव्य आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मंदिर परिसराचा समग्र व नियोजित विकास करणे अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद करुन उपरोक्त वाचा क्र.६ येथील पत्रान्वये जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची दिनांक २९.१२.२०२५ रोजी व मा. पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीची दिनांक २३.०२.२०२६ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे.

०३. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१.०४.२०२६ रोजी संपन्न झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

०४. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४.०५.२०२६ रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत रूपये ३९९३.९० कोटी किंमतीचा 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत सदर विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रस्तुत आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या प्रस्तावित रूपये ३९९३.९० कोटी (अक्षरी रूपये तीन हजार नऊशे त्र्याण्णव कोटी नव्वद लाख फक्त) किंमतीच्या आराखडयास प्रस्तुत शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. प्रस्तुत विकास आराखडयाअंतर्गत खालीलप्रमाणे कामांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना "संनियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, सोलापूर यांना "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जबाबदारी पार पाडण्याकरिता स्वतंत्र कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्यात येणार नाही.

(१) सदर विकास आराखडयाअंतर्गत शासन निर्णयासोबतच्या "परिशिष्ट अ" मधील कामे जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत केलेल्या सादरीकरणानुसार निश्चित करण्यात आलेल्या अंमलबजावणी व कार्यान्वयीन यंत्रणांकडून विहित कालमर्यादेत पूर्ण करून घेण्याची जबाबदारी "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील.

(२) सदर विकास आराखडयामध्ये नियोजन विभागामार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या रूपये ३९९३.९० कोटी किंमतीच्या मान्यता प्राप्त कामांव्यतिरिक्त कोणत्याही कामांचा समावेश करण्यात येऊ नये.

(३) सदर आराखडयातील कामे कोणत्याही अन्य शासकीय योजनेत प्रस्तावित किंवा मंजूर अथवा प्रगतीत नाहीत तसेच सदर कामांची अन्य कोणत्याही आराखडयांतर्गत पुनरावृत्ती होणार नाही, ह्याची खातरजमा करण्याची जबाबदारीसुद्धा "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील.

**(अ) आराखड्यासाठी आवश्यक परवानग्या प्राप्त करून घेणे :-**

(१) 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयातील कामांपैकी ज्या कामांकरिता "वनसंवर्धन कायदा, १९८०" अंतर्गत पूर्वपरवानग्या आवश्यक असतील त्यासाठी मान्यता वेळेत केंद्र व राज्य शासनाच्या विभाग/ कार्यालय/ प्राधिकरणाकडून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील.

(२) या विकास आराखडयातील कामे राबविण्यापूर्वी, आवश्यकता असल्यास "पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६" तसेच "प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळ आणि अवशेष कायदा, १९५८" खाली अनुमती व इतर आवश्यक मान्यता/ आवश्यक ना हरकत परवानगी संबंधित केंद्र व राज्य शासनाच्या विभाग/कार्यालय/प्राधिकरणाकडून घेण्याची जबाबदारी "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील.

(३) सदर आराखड्यांतर्गत कामांसाठी उपरोक्त कायद्यांव्यतिरिक्त विविध कायद्यातील ज्या ज्या तरतूदी लागू आहेत त्या सर्व तरतूदींची तंतोतंत अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील.

**(ब) आराखड्यातील कामांना तांत्रिक मान्यता घेणे :-**

'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयातील कामे सुरू करण्यापूर्वी संबंधित कामांच्या आराखड्यास व अंदाजपत्रकास निश्चित केलेल्या अंमलबजावणी कार्यान्वयीन यंत्रणेचे "सक्षम प्राधिकारी" यांच्याकडून आवश्यकतेनुसार "तांत्रिक मान्यता" या बाबींची पूर्तता करणे/ विहित कार्यपद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. तसेच ही कामे सुरू करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार, जिल्हा परिषद व नगर पालिका या स्थानिक स्वराज्य संस्था यांची देखील आवश्यक ती मान्यता घेण्यात यावी.

**(क) आराखड्याचे संनियंत्रण व अंमलबजावणीसाठी "जिल्हास्तरीय समिती" व "कार्यकारी समिती" गठीत करणे :-**

नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.तीर्थवि-२०१५/प्र.क्र.६/का.१४४४, दिनांक ०४.०६.२०१५ मधील सूचनांनुसार, राज्यस्तरीय शिखर समितीने मान्यता दिलेल्या 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयाचे अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी मा.पालकमंत्री, सोलापूर जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हास्तरीय समिती" आणि "जिल्हाधिकारी, सोलापूर तथा संनियंत्रण अधिकारी" यांच्या अध्यक्षतेखाली "कार्यकारी समिती" गठीत करण्यात आली आहे. 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयाचे संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याचे संपूर्ण अधिकार "जिल्हास्तरीय समिती" यांचे राहतील.

**(ड) आराखड्यासाठी आवश्यकतेनुसार सल्लागार नियुक्त करणे :-**

'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयातील प्रकल्प अहवाल निश्चित केलेल्या कार्यान्वयीन यंत्रणांमार्फत तयार करण्यात यावेत. अत्यंत आवश्यकता असेल तरच, विशिष्ट व तांत्रिक बाबींशी संबंधित कामांसाठी स्वतंत्र व सक्षम सल्लागार याची नियुक्ती करण्याबाबत "जिल्हास्तरीय समिती" कडून मान्यता प्राप्त करून घ्यावी. असा सल्लागार हा वास्तुरचनाकाराने तयार केलेला आराखडा/ नकाशा यानुसार प्राचीन स्मारके व पुरातत्वस्थळांशी संबंधित कामे स्वतंत्रपणे पूर्ण करण्याची क्षमता व बांधिलकी असलेला असावा. नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागाराकडे अशा प्रकारच्या कामाचा पुरेसा अनुभव असावा. सदर आराखडयाकरिता उपरोक्त प्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागारास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५.०१.२०१९ व दिनांक २८.०८.२०२४ च्या शासन निर्णयान्वये (वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांसह) निश्चित केल्यानुसार सल्लागार शुल्क देय राहील. व त्याचा खर्च उपलब्ध निधीमधून करण्यात यावा.

**(इ) आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची देखभाल दुरुस्ती :-**

(१) 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयातील जी कामे विश्वस्त संस्थेच्या मालकीच्या जागेवर करण्यात येणार आहेत अशा कामांसंदर्भात विश्वस्त संस्थेकडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा कामांच्या पूर्णत्वानंतर त्यांची आवश्यक देखभाल व दुरुस्ती, देवस्थान अथवा विश्वस्त संस्थेने करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी "संनियंत्रण अधिकारी" म्हणून अशी कामे सुरू होण्यापूर्वी करारनामा करणे, संबंधित अंमलबजावणी व कार्यान्वयीन यंत्रणांवर बंधनकारक करावे.

१.१ प्रस्तुत विकास आराखडयाअंतर्गत निर्माण होणाऱ्या इतर मालमत्तेची देखभाल व दुरुस्तीसाठीची जबाबदारी व यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद संबंधित अंमलबजावणी व कार्यान्वयीन यंत्रणांकडून होणे अपेक्षित असून ती जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील. निर्माण होणाऱ्या अशा मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही स्वतंत्र निधी नियोजन विभागामार्फत उपलब्ध करून दिला जाणार नाही.

१.२ सदर विकास आराखडयातील कामांमुळे निर्माण होणाऱ्या भाविकांसाठीच्या सुविधा तसेच पर्यटनस्थळ सर्व नागरिकांसाठी खुले राहील अशी अट देवस्थान अथवा विश्वस्त संस्थेबरोबर होणाऱ्या करारामध्ये समाविष्ट करण्यात यावी.

**(ई) आराखड्यांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांकरिता निधी वितरण : -**

(१) 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयाकरिता शासनाकडून वितरीत होणाऱ्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत मंजूर/ वितरीत निधीपेक्षा अतिरिक्त खर्च करण्यात येऊ नये ह्याची दक्षता "जिल्हाधिकारी, सोलापूर" यांची संनियंत्रण अधिकारी म्हणून राहील.

(२) या विकास आराखडयाच्या एकूण किमतीच्या मर्यादेत, आराखड्यातील एका मंजूर कामामधील बचत ही त्याच आराखड्यातील मंजूर अधिक खर्चाच्या दुसऱ्या कामाकडे समायोजित करण्याचे अधिकार हे 'सदर बचत झालेल्या कामांसाठी भविष्यात अतिरिक्त निधीची मागणी न करणे', या अटीच्या अधीन राहून "संनियंत्रण अधिकारी" म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी जिल्हास्तरीय समितीकडून पूर्व परवानगी घेऊन करावी व त्याचा अहवाल स्वतंत्रपणे शासनास १५ दिवसात पाठविण्याची दक्षता घ्यावी.

**(उ) आराखड्याशी संबंधित शासनास सादर करावयाची विवरणपत्रे :-**

०१. 'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर' या विकास आराखडयाच्या निधीमधून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती, तसेच निधीतून होणाऱ्या खर्चाची विवरणपत्रे "परिशिष्ट ब" मध्ये नमूद केल्यानुसार, कार्यान्वयीन यंत्रणेने दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास न चुकता सादर करावीत. तसेच काम पूर्ण झाल्यावर "काम पूर्णत्वाचा दाखला" आणि निधीबाबतचे "उपयोगिता प्रमाणपत्र" न चुकता शासनास सादर करावे. या बाबींकरिता संनियंत्रण अधिकारी यांची जबाबदारी असेल.

०२. जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर यांनी उपरोक्त आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

०३. सदर कामे करताना ऐतिहासिक वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या संस्थांकडून (भारतीय पुरातत्व विभाग तसेच राज्य पुरातत्वीय विभाग) सदर कामे करुन घेण्यात यावीत.

०४. राज्यस्तरीय शिखर समितीच्या निर्देशानुसार आराखडयांतर्गत सर्व कामे विहित पद्धतीने, गुणवत्तापूर्वक व कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत.

०५. सदर योजना सन २०२६-२७ या वर्षापासून अंमलात येईल. या आराखडयातील खर्च “मागणी क्र.ओ-१०, मुख्य लेखाशीर्ष ५४५२, पर्यटनावरील भांडवली खर्च, ०१, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा,१०१-पर्यटन केंद्र, (००) , (००) (१५) तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळ विकास आराखडा (कार्यक्रम/दत्तमत) (५४५२ ०२११) या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध तरतूदीतून करण्यात यावा.

०६. ‘श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर’ या आराखडयाच्या अंमलबजावणी संदर्भात कार्यवाही करताना मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक २१.०४.२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निदेशांचे तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ०४.०५.२०२६ रोजी संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत दिलेल्या निदेशांचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी “संनियंत्रण अधिकारी” म्हणून जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील.

०७. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर समितीच्या दिनांक ०४.०५.२०२६ रोजीच्या बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार सदर प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

०८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६१८१६२५३२३८१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GEETANJALI
SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department,
2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.06.18 16:29:13 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**, तातडीच्या आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हाधिकारी, सोलापूर.

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (राऊशु, क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. संसद सदस्य /विधानसभा/ विधान परिषद सदस्य (सर्व)
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व)
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.

११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
१२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
१४. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
१५. पोलीस अधीक्षक, सोलापूर
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
१७. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई.
१८. मुख्याधिकारी, नगरपरिषद, पंढरपूर.
१९. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे
२०. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर
२१. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर
२२. जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर
२३. निवड नस्ती (का.१४४४-अ), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

# परिशिष्ट-अ

## ‘श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर’

| अ.क्र. | प्रकल्प घटक | रक्कम (कोटी) |
|---|---|---|
| १. | वारकऱ्यांसाठी समग्र सोयीसुविधांचा विकास | २८८.६६ |
| २. | बाधितांना व्यावसायिक संधी | |
| ३. | पुरातन मंदिर व मठांचे जतन व संवर्धन | ३६.०० |
| ४. | मंदिर परिसर- कॉरिडॉर | २५४.६१ |
| | **एकूण पंढरपूर कॉरिडॉर (अ)** | **५७९.२७** |
| ५. | नगर प्रदक्षिणा मार्गाचा विकास | १६२.९४ |
| ६. | नदी घाटांचा विकास व सुशोभिकरण | ४४८.३९ |
| ७. | वाहनतळ व व्यापारी संकुल | ६८.४८ |
| ८. | शहर सुशोभिकरण | ४८०.५० |
| ९. | शहरास जोडणारे रस्ते व पूल | १२७.६० |
| १०. | पालखी तळांचा विकास | १००.०० |
| | **एकूण पंढरपूर शहर विकास नियोजन (ब)** | **१३८७.९१** |
| ११. | भूसंपादन - पुनर्वसन खर्च | १७९२.७२ |
| १२. | भूसंपादन - बाधित इमारत मोबदला | २३४.०० |
| | **एकूण पुनर्वसन खर्च व बाधित इमारत मोबदला (क)** | **२०२६.७२** |
| | **एकूण (अ+ब+क)** | **३९९३.९०** |

GEETANJALI SHRIRAM BAVISKAR

Digitally signed by GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Planning Department,
2.5.4.20=A03A9E9727B369EEB75B33D163EE9206A6B63C23E1DB3F22DAFB1DD79B967A3D, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5EAB451FA908D44F55D92D15BD59E941FB8BB2966266D020EB30C8667F18AD4B, cn=GEETANJALI SHRIRAM BAVISKAR
Date: 2026.06.18 16:29:27 +05'30'

**(गीतांजली बाविस्कर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट-ब

## ‘श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर’

### विवरणपत्र-१ (भौतिक उद्दिष्ट्ये)

| आराखड्यातील एकूण कामांची संख्या | प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या कामांची संख्या | प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाकी असलेल्या कामांची संख्या | कार्यारंभ आदेश देण्यात आलेल्या कामांची संख्या | अंदाजपत्रक स्तरावरील कामांची संख्या | निविदा स्तरावरील कामांची संख्या | पूर्ण झालेल्या कामांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

जिल्हाधिकारी, सोलापूर तथा “संनियंत्रण अधिकारी”
‘श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर’

## विवरणपत्र- २ (भौतिक उद्दिष्ट्ये)

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची कार्यान्वयीन यंत्रणा | कामासाठी मंजूर निधी | कामासाठी आतापर्यंत उपलब्ध करून दिलेला निधी | कामासाठी आतापर्यंत झालेला खर्च | काम पूर्ण करण्याचा दिनांक | काम पूर्ण झाल्याची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

जिल्हाधिकारी, सोलापूर तथा "संनियंत्रण अधिकारी"
'श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर'

विवरणपत्र- ३ (आर्थिक उद्दिष्ट्ये)

| अ | | | ब | | |
|---|---|---|---|---|---|
| आराखड्यास प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व त्यानुसार मंजूर आराखड्याची एकूण किंमत | आराखड्यासाठी आतापर्यंत एकूण वितरीत निधी | आराखड्यासाठी आतापर्यंत एकूण वितरीत निधीपैकी झालेला एकूण खर्च | आराखड्यासाठी सन २०२६-२७ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद | आराखड्यासाठी सन २०२७-२८ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद | आराखड्यासाठी सन २०२८-२९ मध्ये एकूण अर्थसंकल्पित तरतूद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

जिल्हाधिकारी, सोलापूर तथा “संनियंत्रण अधिकारी”
‘श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखडा, पंढरपूर, जि.सोलापूर’